# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. विशेष स्थायी समिती सभा दि. १७/०९/२०१९

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा मंगळवार दि. १७/०९/२०१९ रोजी सभा सुचना क्र. ०९ दि. १६/०९/२०१९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. पिठासीन अधिकारी श्री. रवि व्यास हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. व्यास रवि वासुदेव | सभापती |
| २. | श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ३. | श्रीम. यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ४. | श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंह | सदस्य |
| ५. | श्री. राजीव मेहरा | सदस्य |
| ६. | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ७. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ८. | श्रीम. दिप्ती शेखर भट्ट | सदस्या |
| ९. | श्रीम. वंदना विकास पाटील | सदस्या |
| १०. | श्रीम. वंदना मंगेश पाटील | सदस्या |
| ११. | श्रीम. तारा विनायक घरत | सदस्या |
| १२. | श्री. जुबेर इनामदार | सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| २. | श्रीम. वर्षा गिरधर भानुशाली | सदस्या |
| ३. | श्री. राकेश रतिशचंद्र शाह | सदस्य |
| ४. | श्रीम. निला बर्नाड सोन्स | सदस्या |

**मा. सभापती :-**

सभा चालू करण्यांत यावी.

**धृवकिशोर पाटील :-**

ह्या सभेसाठी स्थायी समिती सदस्यांनी उपस्थित राहायचे आहे. हा विषय नंतर होईल. जोपर्यंत मिटींग सुरु होत नाही.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

शहरामध्ये जी उद्घाटन केली त्या पाटीवर सरनाईक साहेबांचे नाव नाही. तुम्ही राजकारण करता विषय पहिला घेण्यात यावा.

**जुबेर इनामदार :-**

पुढच्या वर्षाची कॉंग्रेस पक्षाची प्रभाग निधी पूर्णपणे बाळासाहेब ठाकरे कला दालनाला देण्यात येईल. पैसे कमी पडतात तर आम्ही देऊ.

**निलम ढवण :-**

बाळासाहेबा सारख्याच्या विषयाला तुम्ही मंजूरी द्यायला ३ वर्ष लावता.

**दिनेश नलावडे :-**

मा. सभापती महोदय ह्या महाराष्ट्रामध्ये एकच दैवत आहे. स्व. बाळासाहेब ठाकरे हे महाराष्ट्राचे दैवत आहे. त्याचा सत्ताधाऱ्यांनी अपमान करायचा ठरवले आहे का त्याचे आम्हाला उत्तर द्या. बाळासाहेबांच्या

बाबतीमध्ये तुम्ही अन्याय करता महाराष्ट्रामध्ये, दिल्लीमध्ये शिवसेनेची सत्ता नाही का? शिवसेनेचे सर्व नगरसेवक ह्या ठिकाणी उपस्थित आहे. त्याचा अर्थ तुम्ही ओळखून जा.

**प्रविण पाटील :-**

तुम्ही हो की नाही जाहिर करा.

**दिनेश नलावडे :-**

मिरा भाईंदर शहरात बाळासाहेबाचा अपमान चालला आहे. तो सहन केला जाणार नाही. छत्रपती शिवाजी महाराज नंतर कुलदैवत बाळासाहेब ठाकरे आहेत.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

हा विषय घ्यायचा नसेल तर आम्ही ही सभा होऊ देणार नाही. पाच मिनिटाचा वेळ देतो.

**निलम ढवण :-**

सादर केलेला गोषवारा आणि त्याच्यावर ठराव आहे. संदर्भिय पत्रात नमूद केल्यानुसार आपणास कळविण्यांत येते की मिरारोड पूर्व आरक्षण क्र. ३०० मध्ये स्व. प्रमोद महाजन कलादालन, भाईंदर पूर्व आरक्षण १२२ ह्या जागेत हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे कला दालन बांधणे कामाच्या अंदाजपत्रकाला मा. महासभा दि. १९/५/२०१७ ठराव क्र. ६ अन्वये अनुक्रमे २३ कोटी व २५ कोटी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता दिली असून सदर कलादालन नकाशाला नगररचना विभागाने मंजूरी दिली आहे. हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे ह्यांच्या कला दालनासाठी मा. आमदार प्रताप सरनाईकना व श्री. रविंद्र फाटक ह्यांच्या आमदार निधीतून २५ लक्षप्रमाणे एकूण रु. ५० लक्ष खर्चास मा. जिल्हाधिकारी ह्यांनी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. स्व. बाळासाहेब ठाकरे कलादालनाचे काम व प्रमोद महाजन कलादालनाचे काम महापालिकेच्या ताब्यातील मोकळ्या जागेवर प्रस्तावित आहे. सदर आरक्षणातील अतिक्रमण असलेल्या जागेवर सदर काम होणार आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (अ) नुसार २५ लक्ष वरील कामाच्या निविदांना मान्यता देण्याचे अधिकार मा. स्थायी समिती सभेस असून त्यानुसार विहीत कार्यवाही करुन व वस्तूस्थिती नमूद करुन मा. नगरसचिव ह्यांच्याकडे दि. ११/०९/२०१९ रोजी मा. स्थायी समितीपूढे ठवेण्यासाठी गोषवारा पाठविण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत निवडणूकीची आचारसंहिता लागण्याची शक्यता असल्याने सदर विषयाचा सोबत जोडलेला गोषवारा दि. १७/०९/२०१९ रोजीच्या मा. स्थायी सभेत ठेवून निर्णय घेण्यास विनंती आहे. हा प्रशासनाकडून स्थायी समितीला ठराव आलेला आहे. प्रशासनाकडून आलेले असताना ह्याच्यात रक्कम नमूद केलेली आहे की पैसे नाहीत असाही प्रकार नाही. टप्प्याटप्प्याने ही रक्कम आमदार आणायला तयार आहेत असे असताना प्रशासनाने दिलेल्या गोषवाय्रामध्ये हा विषय का घेण्यात आला नाही? जर सभापती असे उत्तर देत असतील की पैसे नाही तरतूद नाही तर ते चूकीचे आहे. जाणूनबुजून करण्यात आलेले आहे. प्रशासन झोपले आहे का?

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

१० करोडची तरतूद आहे. १० करोडच्या तरतूदीप्रमाणे टेंडर निघाले आहे.

**निलम ढवण :-**

ह्या विषयाला ३ वर्ष झाली. तुम्ही आता आले म्हणून आम्ही तुम्हाला कल्पना देतो. बाळासाहेबांची माहिती घ्यायची आहे असे सचिवांना सांगितले गेले. ह्या बाळासाहेबांची माहिती ह्यांना आता पाहिजे का? ह्यांनी माहिती नाही का, ह्यांना मोठ कोणी केले बाळासाहेबांनी केले. आता मोठे झाल्यावर गर्व झाला आहे का? सगळीकडे गर्व आहे. तो एक दिवशी जिरल्या शिवाय राहणार नाही. बाळासाहेबांनी जे कोण तोडतील ते जागेवर आल्याशिवाय राहणार नाही. बाळासाहेबांच्या बाबतीत असे झालेले खपवून घेणार नाही. आजच्या आज बाळासाहेबांची विषयाची मंजूरी आली पाहिजे. ह्या सभेत निर्णय झालाच पाहिजे.

**प्रविण पाटील :-**

प्रशासनाचे प्रमुख म्हणून आयुक्त साहेब तुम्ही ह्या सभेत आहात.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

हा विषय झाला नाही तर सभा चालू देणार नाही.

**धृवकिशोर पाटील :-**

आजची सभा रद्द करण्यांत येत आहे. असा मी ठराव मांडत आहे.

**मोहन म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

आजची सभा रद्द करण्यांत येत आहे. सभा संपली असे मी जाहिर करतो.

**(सभा संपण्याची वेळ स.        वाजता)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**



**(वासुदेव शिरवळकर)**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**